# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### धुळे तालुक्यात विद्युत वितरण कंपनीकडे ट्रान्सफार्मरचा तुटवडा असल्याबाबत

**(१) ५८२४ (०४-०४-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे तालुक्यात विद्युत वितरण कंपनीकडे ट्रान्सफार्मरचा तुटवडा असल्याने शेतक-यांना नांदुरुस्त ट्रान्सफार्मनमुळे जलसिंचनासाठी अडचणी निर्माण होत आहे, यासाठी ६३ के.व्ही क्षेमतेच्या ट्रान्सफार्मर ऐवजी १०० के.व्ही.क्षमतेचे ट्रान्सफार्मर लावण्याबबत राज्यमंत्र्यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन दिल्याचे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनावर शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-०६-२०१५) :** (१) राज्यमंत्री पद नसल्यामुळे प्रश्न उदभवत नाही.

(२) धुळे तालुक्यात किंवा जिल्हयात ६३ के.व्ही.ए. चे रोहीत्र नादुरुस्त झाले तर येथे तांत्रिकदृष्ट्या तपासणी करुन आवश्यकतेप्रमाणे ६३ के.व्ही.ए. ऐवजी नवीन १०० के.व्ही.ए. क्षमतेचा रोहित्र कार्यान्वीत करण्यात येतो. तसेच दिन दयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजने (DDUGJY) अंतर्गत धुळे तालुक्यासाठी एकूण ६५२ ठिकाणी ६३ के.व्ही.ए. क्षमतेचे रोहित्र बदलण्याचे काम प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

**राज्यातील महाविद्यालयीन प्रतिनिधींच्या निवडणुका घेण्यासाठी कठोर आचारसंहिता तयार करण्यात येत असल्याबाबत**

**(२) ५८४८ (०८-०४-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. छगन भुजबळ (येवला), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाविद्यालयीन प्रतिनिधींच्या निवडणूकींना हिंसात्मक वळण येऊ लागल्याने शासनाने सन १९९२ पासून त्यावर बंदी घातली होती परंतू आता पुन्हा महाविद्यालयीन प्रतिनिधींच्या निवडणुका घेण्यासाठी कठोर आचारसंहिता तयार करण्यात येत असून ऑन लाईन किंवा SMS व्दारे निवडणूका घेतल्या जाणार असल्याचे माहे डिसेंबर २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने सदरील निवडणूकांसाठी आचारसंहिता बनविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०६-२०१५) :** (१) होय.

(२) विचार प्रक्रिया सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई उच्च न्यायालयाने जुने दावे त्वरीत निकालात काढावयाचं आदेश दिल्याबाबत**

**(३) ५८६० (०७-०४-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उच्च न्यायालयाने सन २०१२ मध्ये वा त्या दरम्यान निर्गमित केलेल्या आदेशानुसार सन २००५ च्या आधीचे दावे त्वरीत निकालात काढण्यात यावेत, असे असताना देखील या आदेशाच्या अंमलबजावणी दिरंगाई होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन या समस्येचे निराकरण करण्यासाठी काही उपाययोजना अंमलात आणणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(४) नसल्यास, त्यामगील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) ५ ते १० वर्षे वरील जुन्या न्यायालयीन प्रकरणांचा उच्च न्यायालयामार्फत वेळोवेळी आढावा घेण्यात येतो व त्या न्यायालयातील प्रकरणांचा निपटारा करण्याच्या दृष्टीने जिल्हा न्यायिक यंत्रणेस वेळोवेळी योग्य ते निदेश दिले जातात. जुनी प्रकरणे निकाली काढण्याच्या

दृष्टीने योग्य ते निदेश देण्याव्यतिरिक्त कच्चे कैदी (ज्यांचे न्यायालयाची खटले सुरू आहेत) व स्त्रीयांसबंधी गुन्ह्यांचे खटले निकाली काढण्यासाठी विशेष मोहिम राबविणे, महालोक अदालत चालविणे, सकाळ व संध्याकाळची विशेष न्यायालय भरविणे, ग्राम न्यायालय चालविणे ह्या प्रकारच्या उपाययोजना राबविण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लक्ष्मीनगर झोनंतर्गत (उत्तर नागपूर) झिंगाबाई टाकळी परिसरात ड्रेनेज पाईपालाईनच्या चेंबरमधून पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन मधून दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याबाबत**

**(४) ५९१२ (०७-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लक्ष्मीनगर झोन अंतर्गत (उत्तर नागपूर) झिंगाबाई टाकळी परिसरात ड्रेनेज पाईपालाईनच्या चेंबरमधून पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकण्यात आली असून सदर पाईपलाईनव्दारे नागरीकांना दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्यामुळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील ठिकाणावरुन पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन वेगळी करण्याबाबत येथील ग्रामस्थांकडून संबंधित विभागाकडे मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :** (१) होय.
(२) नागपूर महानगरपालिकडे ग्रामस्थांकडून पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन वेगळी करण्याबाबत मागणी आलेली नाही. मात्र महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा करणाऱ्या ओ.सी.डब्ल्यू.पी.एल. या सेवा पुरवठादाराच्या प्रतिनिधीस जल वाहिनीस नागपूर सुधार प्रन्यासची सांडपाण्याचा निचरा होणारी वाहिनी छेदत असल्याचे निदर्शनास आले. सदर बाब नागपूर सुधार प्रन्यासच्याही निदर्शनास आणून देण्यात आली आहे.

तसेच सेवा पुरवठादारांकडे दुषित पाणीपुरवठ्याच्या ५ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या व त्यांचे निराकरण करण्यात आले आहे.
(३) नागपूर सुधार प्रन्यासने पाण्याच्या पाईपलाईन सुरक्षित ठेवून सांडपाण्याच्या निचरा होणाऱ्या वाहिनीची दिशा बदलेली आहे.

तथापी, जलवाहनीचे एक-दोन चेंबर्स आढळून आले आहेत. याबाबत नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रस्तुत समस्येचे तात्काळ निराकरण करण्यात यावे असे नागपूर सुधार प्रन्यासला शासन स्तरावरुन दिनांक ०५.०३.२०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपूर जिल्हयातील वीज वितरण कंपनीच्या भोंगळ कारभाराबाबत

**(५) ५९१३ (०४-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात मागील ३ वर्षापासून ४ हजार १३७ शेतक-यांनी कृषिपंपाना वीज जोडण्या देण्यात याव्यात म्हणून वीज वितरण कंपनीकडे अर्जासोबत भरणा केला असूनही वीज वितरण कंपनीच्या भोंगळ कारभारामुळे या शेतक-यांना वीज जोडणीची प्रतिक्षा करावी लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी वीज जोडणीची किती प्रकरणे प्रलंबित आहेत,

(३) सदरील प्रलंबित प्रकरणी तातडीने निकाली काढण्याबाबत शासन काणती कार्यवाही वा उपाययोजना करणार आहे, वा करण्यात येत आहे

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-०६-२०१५) :** (१) खरे आहे.

(२) चंद्रपूर जिल्हयात मार्च २०१५ अखेर ४६६२ इतक्या कृषी पंपधारकाच्या वीज जोडण्या प्रलंबित आहे.

(३) फेब्रुवारी २०१५ वा मार्च २०१५ या दोन महिन्यात ८११ अर्जदारांना वीजजोडण्या दिलेल्या आहेत. तसेच, मार्च २०१५ अखेर एकूण प्रलंबित ४६६२ अर्जदारांपैकी ३६८२ कृषीपंप अर्जदारांच्या वीजजोडणीच्या कामांचे कार्यादेश दिलेले असून कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच, उर्वरित ९८० व एप्रिल २०१५ पर्यंत संभाव्य नवीन अर्ज विचारात घेऊन नवीन निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहेत. कृषीपंप वीजजोडणीच्या कामासाठी शासनाकडून रु.७०.४० कोटींची तरतूद केलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईमधील रसायन तंत्रज्ञान संस्था या विद्यापीठातील शिक्षक वर्गाची सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अद्यापही प्रलंबित असल्याबाबत

**(६) ५९२७ (०९-०४-२०१५). श्री. छगन भुजबळ (येवला), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमधील रसायन तंत्रज्ञान संस्था या विद्यापीठातील शिक्षक वर्गाची सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अद्यापही प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यापीठातील शिक्षकांच्या वेतन आयोगाच्या थकबाकीबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनास निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई या संस्थेचे कुलगुरु यांनी दिनांक ८/९/२०१५ रोजी शासनास पत्र दिले आहे.
(३) रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई या संस्थेसह राज्यातील शासकीय व अशासकीय अनुदानीत अभियांत्रिकी व इतर पदवी महाविद्यालयातील / संस्थांतील अध्यापकांना ६ व्या वेतन आयोगाच्या थक्बाकीपैकी २० टक्के राज्य शासन व ८० टक्के थकबाकी केंद्र शासनाकडून देणे अपेक्षित आहे. या पैकी राज्य शासनाने २० टक्के थकबाकीची रक्कम आद केली आहे केंद्र शासनाकडील ८० टक्के थकबाकीची रक्कम अदर करण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठांबाबत डॉ.राम ताकवले व त्यागराजन या समित्यांनी शासनास सादर केलेल्या अहवालाबाबत**

**(७) ५९२९ (०९-०४-२०१५). श्री. छगन भुजबळ (येवला), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठांबाबत डॉ.राम ताकवले व त्यागराजन या समित्यांनी शासनास सादर केलेले अहवाल दिनांक ९ मे, २०१२ पासून शासनाकडे निर्णयासाठी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉ.राम ताकवले समितीने मुंबई, पुणे व नागपूर विद्यापीठांचे विभाजन करुन स्वतंत्र विद्यापीठे स्थापन करण्याबाबत तर त्यागराजन समितीने प्रत्येक विद्यापीठात किमान १०० महाविद्यालयांचा समावेश असावा याबाबत आपल्या अहवालांमध्ये शासनास शिफारशी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) नुसार महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियमांच्या तरतुदींना अंतीम स्वरुप देवून ३५ नवीन उपविद्यापीठांची निर्मिती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :** (१) होय. डॉ.राम ताकवले समितीचा अहवाल प्रलंबित आहे.
(२) डॉ. राम ताकवले समितीने मोठ्या विद्यापीठाचे विभाजन करण्याची शिफारस केली आहे.
(३) अहवाल विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक शहर परिसरातील ग्रामीण भागाचा झपाटयाने होणारा विस्तार पाहता नाशिकसाठी मेट्रो रेल्वेचे सर्वेक्षण करण्याबाबत

**(८) ५९५० (०७-०४-२०१५). श्री. छगन भुजबळ (येवला), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) नाशिक शहर परिसरातील ग्रामीण भागाचा झपाटयाने होणारा विस्तार पाहता नाशिकसाठी मेट्रो रेल्वेचे सर्वेक्षण हाती घेण्याची नाशिक जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक शहरातील नागरी वाहतुकी विषयक सर्वकष अभ्यास अहवाल तयार करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेस शासनाने निर्देश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देशभरात वेगाने विकसित होणाऱ्या शहरांमध्ये नाशिकचा १६ वा क्रमांक असल्याचे एका आंतरराष्ट्रीय पाहणीत आढळून आल्यामुळे आगामी काळात नाशिक महानगरपालिकेसाठी दळणवळणाची साधने अपुरी पडणार असल्यामुळे नाशिक मेट्रो प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे आहे. सदर प्रकरणी शहर वाहतुक विषयक अभ्यास करणेकामी तज्ञ सल्लागार यांची नेमणूक होणेबाबत नाशिक महानगरपालिकेच्या स्तरावरु न निविदा मागविण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना अधिक लोकाभिमुख होण्यासाठी या योजनेचे कव्हरेज वाढविण्याची

**(९) ६००० (०८-०४-२०१५). श्री. छगन भुजबळ (येवला), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना अधिक लोकाभिमुख होण्यासाठी या योजनेचे कव्हरेज वाढविण्याची तसेच अन्य काही सुचनांवर शासनाने विचार करण्याची लोकप्रतिनिधींनी मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नागपूर विभागातील अर्नेजा हर्ट इन्स्टिट्युटसह काही खाजगी रुग्णालयांची दोन वर्षा पासून ८ कोटी रुपयांची देयके शासनाने न दिल्यामुळे सदर खाजगी रुग्णालयांनी उक्त योजनेच्या शस्त्रक्रिया करण्यास नकार दिल्याची धक्कादायक बाब दिनांक २८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (२) व मधील थकीत देयकांबाबत नागपूरच्या आरोग्य उपसंचालक कार्यालयाने आरोग्य सेवा संचालनालयास वेळोवेळी स्मरणपत्रे पाठविलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग (१), (२) व (३) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (११-०६-२०१५) :** (१) होय.
(२) अर्नेजा हार्ट इन्स्टीट्युटसह नागपूर परिमंडळातील रुग्णालयांची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत केलेल्या उपचारांची थकबाकी प्रलंबित नसुन जुन्या जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत समाविष्ट रुग्णालयांची मार्च, २०१४ अखेर रु.१२.१३ कोटी एवढी थकबाकी प्रलंबित होती. त्यापैकी फेब्रुवारी, २०१५ अखेर रु.५.१९ कोटी एवढी रक्कम मंजूर करण्यात आली असुन आज दिनांकास रु.६.९४ कोटी एवढ्या रक्कमेची देयके प्रलंबित आहेत. त्यामध्ये अर्नेजा हार्ट इन्स्टीटयुट या रुग्णालयाच्या रु.२१.३४ लाख एवढ्या प्रलंबित देयकांचा समावेश आहे.
जुनी जीवदायी आरोग्य योजना बंद झाली असून राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत नागपूर परिमंडळातील रुग्णालयांनी पैसे अदा न केल्यामुळे उपचारास नकार दिल्याची तक्रार प्राप्त नाही.
(३) होय.
(४) जीवनदायी आरोग्य योजनेतंर्गत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात उपलब्ध तरतुद विचारात घेऊन संबंधित रुग्णालयांची देयके अदा करण्यासाठी रु.३०.८० कोटी एवढा उलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच उर्वरित प्रलंबित देयके अदा करण्यासाठी निधी उपलब्ध होण्यासंबंधाने वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित असल्याबाबत

**(१०) ६००३ (०९-०४-२०१५). श्री. छगन भुजबळ (येवला), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित असल्यामुळे पश्चिमवाहीनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याबाबतचे मांजरपाडासह इतर १७ वळण योजना तसेच दरसवाडी पोहाच कालवा, इतयादी योजनांची केवळ १०/२० टक्के अपुर्ण कामे रखडल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच मांजरपाडा वळण योजनेसाठी सन २०१४-१५ मध्ये ७० कोटी अनुदान मंजूर असूनही केवळ सुप्रमा अभावी निधी खर्च करता येत नसल्याने या प्रकल्पाचे काम बंद पडले असून सदर प्रकल्पासाठी मंजूर निधी खर्च करण्यासाठी शासनाने परवानगी देण्याची माहे जानेवारी, २०१५ मध्ये मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) उर्ध्व गोदावरी प्रकल्पाचा तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद मार्फत शासनास प्राप्त झाला होता. तथापि, सिंचन विषयक चौकशी समितीच्या अहवालावरील शासनाचा कार्यपालन अहवाल मुद्दा क्र. ९.४.५ च्या अनुषंगाने राज्य तांत्रिक सल्लागार समिती नाशिक अंतर्गत अधीक्षक अभियंता (व्दारे) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांच्यामार्फत सदर प्रस्तावाची तांत्रिक छाननी प्रगतीत आहे.

SLTAC समितीमार्फत या प्रकल्पाची चौकशी करण्यात येत असल्याने सदर प्रकल्पाचा सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील मंजूर रु. ७०.०० कोटी अनुदान चालु वित्तीय वर्षात खर्च करण्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुकडी प्रकल्पातील माणिकडोह धरण ते येडगांव धरण असा कालवा किंवा बोगदा करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत

**(११) ६०४३ (०७-०४-२०१५). श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुकडी प्रकल्पातील माणिकडोह धरण ते येडगांव धरण असा कालवा किंवा बोगदा करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डिंभे ते येडगांव कालव्याची गळती थांबवुन क्षमता वाढविण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास याबाबत शासनस्तरावरून कुठली कार्यवाही केली वा करण्यात येत आहे वा शासनाची प्रतिक्रिया?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शिक्षकांना संगणक अर्हता परिक्षा (एमएससीआयटी) उत्तीर्ण करुन शासनास प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत**

**(१२) ६०९१ (०९-०४-२०१५). श्री. दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकांना संगणक अर्हता परीक्षा (एमएससीआयटी) उत्तीर्ण करुन शासनास प्रमाणपत्र सादर करण्यास शासनाने दिनांक ३१ डिसेंबर, २००७ पर्यंत मुदतवाढ दिली होती, हे खरे आहे काय,
(२) राज्यातील काही शिक्षक सन २००७ नंतर सुद्धा संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाले असून काही शिक्षक अद्याप संगणक अर्हता परिक्षेला बसले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) शासनाने सन २००७ नंतर संगणक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांची वेतनवाढ रद्द केली असून शिक्षकांकडून ही रक्कम त्यांच्या पगारातून वळती करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) या निर्णयामुळे राज्यातील शिक्षकांचे आर्थिक नुकसान होणार असल्याने संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण करण्यास माहे डिसेंबर, २०१५ पर्यंत मुदतवाढ मिळण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०४-०६-२०१५) :** (१), (२) व (३) होय.
(४) संगणक अहता परिक्षा उत्तीर्ण करण्यास डिसेंबर, २०१५ पर्यंत मुदतवाढ मिळण्याची मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(५) सामान्य प्रशासन विभागाच्या दि.५.५.२००७ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्रातील शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांना संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दि.३१.१२.२००७ पर्यंत मुतद वाढवून देण्यात आली असून सदर मुदतवाढ अंतिम मुदतवाढ आहे.

---

**राज्यातील ग्रंथालयाने अ, ब, क व ड असे वर्ग पाडण्यात आलेल्या ग्रंथालयाचे प्रस्ताव मान्यतेसाठी प्रलंबित असल्याबाबत**

**(१३) ६१२४ (०८-०४-२०१५). श्री. शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रंथालयाने अ, ब, क व ड असे वर्ग पाडण्यात आलेल्या ग्रंथालयाचे प्रस्ताव मान्यतेसाठी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावांना त्वरीत मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :** (१) नाही.

दिनांक २.६.२०१४ रोजीच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत, यापुढे नवीन ग्रंथालयांना मान्यता देण्यात येऊ नये, असा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत शासन निर्णय, दिनांक ७.६.२०१४ अनवये निर्गमित करण्यात आलेला आहे.

सन २०१२-१३ पासून सार्वजनिक ग्रंथालयांना शासनमान्यता देण्याबाबतचे प्रस्ताव मागविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे ग्रंथालयचे प्रस्ताव मान्यतेसाठी प्रलंबित नाहीत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचाड (जि.रायगड) येथील राजमाता जिजाऊ यांच्य राजवाड्याची झालेली दुरवस्था**

**(१४) ६१८६ (०७-०४-२०१५). श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री. सदा सरवणकर (माहिम), डॉ. बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील पाचाड येथील राजमाता जिजाऊ यांच्या राजवाडा परिसराकडे पुरातत्व खात्याचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदर राजवाडा परिसरातील कोसळलेली तटबंदी व पडलेल्या भागाची दुरूस्ती करण्यात यावी अशी मागणी तेथील शिवभक्त, ग्रामस्थ व पर्यटकांनी पुरातत्व विभागाच्या अधिका-यांकडे वारंवार करूनही त्यांनी दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, राजवाड्यालगतच्या १४ एकर परिसराला पुरातत्व खात्याने संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने कोसळत चाललेल्या तटबंदी व राजवाड्याच्या डागडुजीसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही. अधिक्षक, पुरातत्वविद् भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मुंबई यांनी दिलेल्या माहितीनुसार राजमाता जिजाऊ स्मारक हे सुस्थितीत असून दरवर्षी पावसाळ्यानंतर स्मारकवर उगवाणा-या झाडा झुडपांची सफाई केली जाते.
(२) हे खरे नाही.
(३) अंशतः खरे आहे. अधिसूचनेत राजमाता जिजाऊ राजवाड्याचा एकूण परिसर ५ एकर आणि ४ गुंठे इतका आहे.
(४) पुरातत्वीक नियमानुसार गतवर्षी राजवाड्याचे डागडुजीचे काम करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील ई-सेवा केंद्र बंद करण्यात आल्याबाबत**

**(१५) ६२०९ (०७-०४-२०१५). श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागांतर्गत महा-ई सेवा केंद्र हा प्रकल्प सन २०११ पासून ११ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे हे खरे आहे काय,
(२) राज्य भरातील या प्रकल्पांचा ठेका राज्य शासनाने स्पॅन्को या कंपनीला देण्यात आला आहे आणि कंपनीने ठिकठिकाणी उपठेकेदार नेमून ही केंद्र चालवित आहे हे ही खरे आहे काय,
(३) महा -ई सेवा केंद्रातून सर्व प्रकारचे दाखले ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याच्या सूचना असताना रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील ई-सेवा केंद्रांमध्ये ऑफलाईन पध्दतीने दाखले काढून त्यावर तहसिलदार, प्रांताधिकारी यांच्या सहया घेण्यात आल्या आणि हा प्रकार जानेवारी, २०१५ मध्ये उघड झाल्यानंतर तालुक्यातील ई-सेवा केंद्र बंद करण्यात आली हे खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद् नुसार पुढे कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :** (१) महा-ई-सेवा प्रकल्प २००८ पासून सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे.
(२) कोकण व पुणे विभागाकरीता स्पॅन्को टेलिसिस्टम्स ॲन्ड सोल्युशन्स लि. यांची निवड करण्यात आली आहे. सेतू महाराष्ट्राच्या वतीन जिल्हाधिकारी यांनी मंजूर केलेल्या ठिकाणी स्पॅन्को लि. कंपनी तर्फे ऑपरेटर नियुक्त करून केंद्र चालविली जातात.

(३) होय.
(४) रत्नागिरी जिल्हाधिकारी खेड तालुक्यात ५ केंद्रात ऑफलाईन दाखले नोंदणी झाल्याचे आढळून आल्याने या केंद्रांच्या सेवा बंद करण्यात आल्या आहेत. सध्या खेड तालुक्यातील सर्व सेवा सेतू मार्फत मॅन्युअल पध्दतीने दिल्या जात आहेत.

---

## शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील रांजणगाव एमआयडीसी मधील जे बिल सर्कीट प्रा.लि. या कंपनीबाबत

**(१६) ६२७३ (०६-०४-२०१५). श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरुर तालुक्यातील (जि.पुणे) रांजणगाव एमआयडीसी मधील जे बिल सर्कीट प्रा.लि. या कंपनीमध्ये सन २००५ पासून आजपर्यंत कायम कामगारांऐवजी कंत्राटी कामगारांना मुख्य उत्पादन प्रक्रियेत वापरले जाते, त्या सर्व कामगारांना कायम करणेबाबत लोकप्रतिनिधी शिरुर यांनी दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी मा. कामगार मंत्री महोदयांकडे तक्रार दाखल करुनही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कंपनीमध्ये २०० ते ३०० माथाडी कामगारांची आवश्यकता असतांना फक्त १३ माथाडी कामगारांकडून काम करुन घेतले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कंपनीमध्ये महिला कामगारांकडून रात्रपाळीत शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय काम करून घेतले जाते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या कंपनीने कारखाना सुरु झाल्यापासून कामगार कल्याण निधी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे जमा केला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येते आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (१५-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

मे.जेबील सर्किट इंडिया प्रा.लि.रांजणगाव एमआयडीसी तालुका शिरुर, जिल्हा पुणे ही कंपनी मंडळात नोंदणी क्रमांक ३५८१ दि.२३.१०.२०१३ अन्वये मालक म्हणून नोंदीत आहेत.

कंपनीमध्ये माथाडी स्वरुपाचे काम करणाऱ्या (१६) कामगारांची नोंदी केली आहे. त्यापैकी सध्या १३ नोंदीत कामगार काम करीत आहेत. कै.नवनाथ चिमाजी मलगुंडे या नोंदीत मयत कामगाराच्या जागी त्याचा सख्या भाऊ श्री.दत्तात्रय चिमाजी मलगुंडे याची कामगार नोंदणी बाबतची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कंपनीत दि.०९.०२.२०१५ रोजी निरीक्षण केले असता, पॅलेट व मायनीवर रचणे, वाहतूक करणे व येणाऱ्या जाणाऱ्या मालाच्या उतराई/भराईचे काम नोंदीत माथाडी कामगार करीत असताना आढळले आहे. त्यामुळे उपस्थित केलेल्या प्रश्नामध्ये तथ्य नाही.

(३) या संदर्भात मा.न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिका क्र.२८७९/२००७ वर दि.१३/१२/२००७ रोजी झालेल्या निर्णयात कारखाने अधिनियम,१९४८ मधील संबंधित कलमास मा.न्यायालयाने विना अट स्थगिती आदेश दिल्यामुळे शासनाची पुर्व परवानगीची आवश्यकता नाही.

सदर याचिका न्याय प्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इनामगाव (ता.शिरुर,जि.पुणे) येथील उत्खनन क्षेत्राची झालेली दुरवस्था**

**(१७) ६३०६ (०७-०४-२०१५). श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इनामगाव (ता.शिरूर,जि.पुणे) येथे सन १९६७ ते १९८२ च्या दरम्यान डेक्कन कॉलेज पुणे च्या पुरातत्व विभागाने उत्खनन व सर्वे केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इनामगावच्या उत्खननामध्ये ताम्र पाषाण युगी मानवी संस्कृतीचे अवेशष सापडले व राज्य शासनाने सदर उत्खननाच्या जागेला राज्य संरक्षित स्थळ म्हणून घोषित केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इनामगाव येथील सदर उत्खनन क्षेत्राची दुरवस्था झाली असून तेथे पर्यटकांना जाण्यास कोणत्याही सुविधा व रस्ता उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. सदरहू ठिकाण हे वास्तू स्वरुपात नसून ते संरक्षित स्थळ आहे. या संरक्षित क्षेत्रात उत्खनन झाले आहे. या ठिकाणी जाण्यास कच्च स्वरुपात पोहोचमार्ग आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्याच्या ग्रामीण व शहरी भागामध्ये**
**वीज वितरण कंपनीच्या ट्रान्सफार्मरची होत असलेली चोरी**

**(१८) ६३२८ (०८-०३-२०१५). श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्याच्या ग्रामीण व शहरी भागामध्ये वीज वितरण कंपनीच्या ट्रान्सफार्मरची चोरी करणारी मोठी टोळी सक्रीय असल्याने खेड व मावळ तालुक्यात सन २०१४ या वर्षभरात ११९ ट्रान्सफार्मर चोरीला गेले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास पुणे जिल्हयातील शिरुर, खेड व मावळ तालुक्यात अनेक ट्रान्सफार्मर चोरीला जाऊनही चोरानवर अदयाप पर्यंत महावितरण कंपनीकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास पुणे जिल्हयातील ट्रान्सफार्मर चोरीला आळा घालण्यासाठी शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-०६-२०१५) :** (१) होय.
(२) नाही.
(३) महाविरण कंपनींकडून खबरदारीचे उपाय म्हणून रोहित्र खांबासोबत वेल्डिंग करणे, स्थानिक पोलीसांसोबत गस्त घालणे तसेच काही ठिकाणी महावितरणचे स्वतंत्र गस्त पथक नेमणे व शक्य तिथे लोकवस्तीच्या जवळ स्थलांतरीत करणे या उपाययोजना केलेल्या आहेत. चोरी झालेल्या रोहित्रांच्या ठिकाणी दुसरे रोहित्र बसवून सदर ठिकाणचा वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आलेला आहे.

---

**न्हावा-शेवा ते शिवडी या २२ किलोमीटरच्या सागरी सेतु बांधण्याबाबत**

**(१९) ६४४४ (०७-०४-२०१५). श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) न्हावा-शेवा ते शिवडी या २२ किलोमीटरच्या सागरी सेतु बांधण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मुंबई ट्रान्सहार्बर लिंक प्रकल्पातील कुठलीच कंपनी पुढे न आल्याने निविदा प्रक्रिया सप्टेंबर, २०१३ मध्ये रद्द करुन एमएमआरडीए ने इंजिनिअरिंग प्राक्युरमेंट कन्स्ट्रक्शनसोबत (ईपीसी) हा प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पाच्या बांधकामासंदर्भात जुलै, २०१४ मध्ये जायका बँकेच्या प्रतिनिधिंनी प्रस्तावित ट्रान्सहार्बर लिंक मार्गाचे सर्वेक्षण केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती काय आहे व या प्रकल्पाचे काम हाती घेण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) व (२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे मुंबई पारबंदर प्रकल्पाची अंमलबजावणी सार्वजनिक खाजगी सहभाग तत्त्वावर (PPP- Public Private Partnership) करणेकरिता निविदा बोलविण्यात आल्या होत्या. तथापि, या निविदाप्रक्रियेला प्रतिसाद प्राप्त झाला नाही. तद् नंतर या प्रकल्पाची अंमलबजावणी जपान इंटरनॅशलन कार्पोरेशन एजन्सी (JICA) या जपान शासन पुरस्कृत संस्थेकडून कर्ज प्राप्त करुन इंजिनिअरिंग प्रोक्युरमेंट ॲड कन्स्टक्शन (ईपीसी) तत्त्वावर करण्याचा निर्णय शासनाने घेतला.

(३) नाही. तथापि, याबाबत जायका (JICA)या संस्थेच्या प्रतिनिधींसोबत जुलै, २०१४ मध्ये प्राथमिक चर्चा झाली आहे.

(४) या प्रकल्पाची अंमलबजावणी जायका (JICA)या जपानी शासन पुरस्कृत संस्थेकडून कर्ज प्राप्त करुन इंजिनिअरिंग प्रोक्युरमेंट अँड कन्स्ट्रक्शन (ईपीसी) तत्त्वावर करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात आला असून या प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शालेय अभ्यासक्रमात रस्ता सुरक्षा या विषयाचा समावेश करण्याबाबत**

**(२०) ६५६७ (०९-०४-२०१५). श्री. सदा सरवणकर (माहिम), श्री. तुकाराम काते (अणुशक्ती नगर), डॉ. बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहरातील रस्त्यांवरील वाहतूकीचे नियम लहानपणीच मुलांना समजावे व त्यांना वाहतूकीची शिस्त लागावी यासाठी रस्ता सुरक्षा या विषयाचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०६-२०१५) :** (१) व (२) होय. रस्ता सुरक्षा या विषयाचा शालेय अभ्यासक्रमात खालीलप्रमाणे समावेश केलेला आहे.

इयत्ता ५ वी च्या परिसर अभ्यास या विषयाच्या वाहतूक व संदेशवहन या घटाकत वाहतुकीचे पैलू व सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नियम इ.७ वी च्या आपत्ती व्यवस्थापन या घटकात रस्ता सुरक्षा, वाहतुकीचे नियम, इ. ९ वी व १० वी च्या वैकल्पिक गटातील नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा या विषयाच्या अभ्यासक्रमात वाहतूक नियंत्रणाचे इशारे, मोटार चालक/मोटार सायकल चालकाकरीता नियम, वाहन व वाहनांचे प्रकार या बाबीचा समावेश तसेच इ. ९ वी च्या महाराष्ट्र छात्रसेना या विषयाच्या अभ्यासक्रमात वाहतूकीचे नियम व अंतर्गत सुरक्षितता या घटकाचा समावेश करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चासकमान (ता.खेड, जि.पुणे) डावा कालव्याचे अस्तरीकरणाबाबत**

**(२१) ६५९८ (०७-०४-२०१५). श्री. सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चास-कमान (ता.खेड, जि.पुणे) डावा कालव्याचे अस्तरीकरण झालेले नसल्याने कालव्यातील पाण्याची गळती होऊन कालव्यालगतची जमिनी नापीक होत असल्याने स्थानिक खासदार व आमदारांनी अस्तरीकरणाची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याच्या अस्तरीकरणबाबत आतापर्यंत कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत व कालव्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर काय कारवाई करण्यात आली आहे,

(३) असल्यास, कालव्याच्या अस्तीकरणाचे काम व निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदाराविरूध्दची कारवाई किती कालावधीत पुर्ण करण्यात येणार आहे?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :** (१) होय, अंशतः खरे आहे.

(२) सदर प्रकल्पाच्या तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेच प्रस्ताव कार्यवाहीत असून सदरहू मान्यता मिळाल्यानंतर निधी उपलब्धततेनुसार कालव्याच्या अस्तरीकरणाची कामे करण्यात येतील. चासकमान डावा कालव्याच्या निविदेअंतर्गत कुठलेही काम निकृष्ट दर्जाचे झालेले नाही. त्यामुळे ठेकेदारावर कारवाईचा प्रश्न निर्माण होत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण पुर्व तसेच अंबरनाथ तालुक्यातील ग्रामीण भागात शासकीय रुग्णालय नसल्याबाबत**

**(२२) ६६५० (०६-०४-२०१५). श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण पुर्व तसेच अंबरनाथ तालुक्यातील ग्रामीण भागात शासकीय रुग्णालय नसल्याने जनतेची गैरसोय होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे ८ ते १० लाख लोकसंख्या असलेल्या या विभागात शासकीय रुग्णालय होण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधीनी वारंवार पत्र व्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णालयाकरीता कल्याण पूर्व भागात कल्याण-डोंबिवली महापालिका भुखंड उपलब्ध करुन देणार आहे काय,

(४) असल्यास, हे शासकीय रुग्णालय सुरु करण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (११-०६-२०१५) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात महानगर पालिकेचे दवाखाने आहेत. महानगरपालिका क्षेत्रात आरोग्य सेवा पुरविण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेची आहे. लोकसंख्या प्रमाणानुसार त्यांनी

रुग्णालय स्थापनेचा कार्यक्रम हाती घेणे हे त्यांच्या कार्यक्षेत्रात येते तथापि सार्वजनिक आरोग्य विभागातंर्गत अंबरनाथ पासून ७-८ कि.मी. वर शासकीय ग्रामीण रुग्णालय, बदलापूर व ६कि.मी.वर उल्हासनगर येथे २०० खाटांचे रुग्णालय आणि उल्हासनगर-४ येथे महिलांसाठी ५० खाटांचा प्रसुती दवाखाना कार्यान्वित आहे.
(३) व (४) कल्याण पूर्व भागात शासकीय रुग्णालय स्थापन करण्यासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून अद्याप भूखंड उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही.

---

**औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) व परीक्षा घेणारे मंडळ यांच्यामधील समन्वयाच्या अभावामुळे ८० टक्के विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्याबाबत**

**(२३) ६६६९ (०८-०४-२०१५). श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) व परीक्षा घेणारे मंडळ यांच्यामधील समन्वयाचा अभाव तसेच नकारात्मक गुणपध्दती लागू केल्यामुळे ८० टक्के विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परीक्षा पध्दतीने साध्या औद्योगिक प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांवर प्रशिक्षण थांबविण्याची वेळ आली असून अनेक विद्यार्थ्यांना विविध कंपन्यात सामावून घेणे कठीण झाले असून उक्त निकालाने त्यांचे भविष्य धोक्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना न्याय देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०४-०६-२०१५) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तथापी, डी.जी.ई.टी., नवी दिल्ली यांनी दि.२७.०५.२०१४ च्या पत्रान्वये नकारात्मक गुणपध्दती लागू करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांचा निकाल कमी लागल्याने नकारात्मक गुणपध्दती रद्द करण्याबाबत संचालनालय स्तरावरुन डी.जी.ई.टी., नवी दिल्ली यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आला. त्या अनुसरुन डी.जी.ई.टी., नवी दिल्ली यांनी ऑगस्ट २०१४ मध्ये घेण्यात आलेल्या अखिल भारतीय व्यवसाय सत्र परीक्षेतील नकारात्मक गुणपध्दत एक विशेष बाब म्हणून जुलै/ऑगस्ट २०१५ या परीक्षेकरीता रद्द केली आहे. त्यानुसार ७५ टक्के निकाल लागलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियांना अंतर्गत राबण्यिात येणाऱ्या महाराष्ट्रातील ११ नगरपालिकांच्या मालनि:सारण आणि पाणी पुरवठा योजनांसाठी १० महिन्यापूर्वी मंजूर असल्याबाबत**

**(२४) ६८२५ (०७-०४-२०१५). श्री. प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियांना अंतर्गत राबयित येणाऱ्या महाराष्ट्रातील ११ नगरपालिकांच्या मलनि:सारण आणि पाणी पुरवठा योजनांसाठी १० महिन्यापूर्वी मंजूर झालेला ९८१ कोटी ८८ लाखांचा निधी केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याला दिला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधीचा पुरवठा न झाल्याने नगरपालिकांचे मलनि:सारण व पाणी पुरवठा योजनांचे भवितव्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :** (१) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाच्या युआयडीएसएसएमटी या उपअभियानांअंतर्गत ८ नगरपालिकांच्या व ३ महानगरपालिकांच्या रु. ११७९ कोटी किंमतीच्या पाणी पुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाच्या प्रस्तावांना केंद्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाने मान्यता दिलेली होती. तथापि सदर प्रकल्पांसाठी केंद्र शासनाकडून निधी वितरीत करण्यात आलेला नाही. हे खरे आहे.
(२) व (३) राज्य शासनाच्या वतीने सदर प्रकल्पांना निधी वितरीत करण्याच्या अनुषंगाने विभागाच्या तसेच मा.मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावरुन केंद्र शासनाकडे पत्रव्यवहार करुन पाठपूरावा करण्यात आलेला होता. तथापि, केंद्र शासनाने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाच्या ट्रांझिशन फेज अंतर्गत मंजूर केलेल तथापि ३१ मार्च, २०१४ पूर्वी निधी वितरीत न केलेले प्रकल्प रद्द समजण्यात यावेत व केंद्र शासनामार्फत नव्याने घोषित होणाऱ्या योजनेअंतर्गत सदर प्रस्ताव फेरसादर करता येऊ शकतील असे केंद्र शासनामार्फत कळविण्यात आले आहे.

---

**महापे ते विक्रोळी अशा खाडीपूल बांधण्याबाबत**

**(२५) ६८६० (०७-०६-२०१५). श्री. संदीप नाईक (ऐरोली), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईवरुन मुंबईला लवकर पोहचता यावे यासाठी महापे ते विक्रोळी अशा खाडीपूल बांधण्याच्या शासनाने निर्णय घेऊन एमएमआरडीए मार्फत सर्व्हेक्षणचे काम पूर्ण होऊनही खाडीपुलाच्या बांधकामास अद्याप सुरुवात करण्यात आली नसल्याची बाब जानेवारी, २०१५ मध्ये उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खाडीपूलाचे बांधकाम पूर्ण व्हावे यासाठी निधीची तरतुद करण्यात यावी म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना जानेवारी, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त खाडीपूलाचे बांधकाम सुरु न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व अनु. क्र.२ येथील निवेदनाच्या अनुषंगाने शासनास्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१५) :** (१), (२) व (३) होय, "घाटकोपर ते कोपरखैरणे" या पुलाकरीता शक्याशक्यता अभ्यास (Feasibility Study) करणेकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मेसर्स एन.पी.बिल्डींग या सल्लागाराची नेमणूक करण्यात आली असून शक्याशक्यता अभ्यास प्रगतीपथावर आहे. सदर सल्लागाराने अंतिम अहवाल सादर केल्यानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

---

## मुंबई परिसरातील गिरणी कामगारांनी गिरण्यांच्या जागेवर बांधकाम करणे, एमएमआरडीएच्या तयार घरांची लॉटरी काढणे, चार गिरण्यांच्या जमिनींचे एकत्रिकरण इ. मागण्यांसाठी

**(२६) ७०२१ (०६-०४-२०१५). श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई परिसरातील गिरणी कामगारांनी गिरण्यांच्या जागेवर बांधकाम करणे, एमएमआरडीएच्या तयार घरांची लॉटरी काढणे, चार गिरण्यांच्या जमिनींचे एकत्रिकरण इ. मागण्यांसाठी दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी आंदोलन करुन मा.मुख्यमंत्री, मा.गृहनिर्माण मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच गिरणी कामगारांना हक्काची घरे मिळावीत व समस्या सोडविण्यासंदर्भात सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (०८-०६-२०१५) :** (१), (२) व (३) अशा स्वरुपाच्या मागण्यांचे मा.मुख्यमंत्री महोदय यांना लिहिलेले दि.१०.१२.२०१४ रोजीचे निवेदन दि.२२.०१.२०१५ रोजी प्राप्त झाले आहे. सदर निवेदनातील मागण्या नगरविकास विभाग, कामगार विभाग, वस्त्रोद्योग विभाग, म्हाडा इ.शी संबंधित असल्याने त्या विभागांकडून माहिती / अभिप्राय मागविण्यांत आलेले आहेत.

म्हाडाकडून प्राप्त अहवालानुसार म्हाडास प्राप्त होणा-या ३६ गिरण्यांच्या १५.९२ हेक्टर जमिनीवर गिरणी कामगारांसाठी १६७०० सदनिका बांधणे शक्य आहे. म्हाडास प्राप्त होणा-या ३६ गिरण्यांपैकी ३१ गिरण्यांच्या २५ ठिकाणी १३.२० हेक्टर जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेण्यात

आला आहे. त्यापैकी १९ गिरण्यांच्या ६.८३ हेक्टर जमिनीवर ११ ठिकाणी गिरणी कामगारांसाठी ६९४८ सदनिकांचे काम पूर्ण झाले आहे.

म्हाडाच्या ताब्यात आलेल्या ६ गिरण्यांच्या जमिनीचे क्षेत्रफळ लहान असल्यामुळे सदर भूखंड हे म्हाडाच्या ताब्यात असलेल्या वेस्टर्न इंडिया (लिज होल्ड एमएसटीसीचा भाग) जमिनीच्या लगत असलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या एका मोठ्या मोकळ्या मैदानाच्या भूखंडाबरोबर अदलाबदल करण्याच्या अनुषंगाने नगर विकास विभागाच्या अधिसूचना क्र.टीपीबी ४३१२/प्र.क्र.७/२०१२/नवि-११, दि.१७.०३.२०१५ अन्वये पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. वरील ६ गिरण्यांचे ३८७३.८३ चौ.मी. क्षेत्र आणि भारत मिल, सेंच्युरी मिल, ज्युबिली मिल (स्वान मिल शिवडीचा भाग) (वेस्टर्न इंडिया ते लिजहोल्ड एमएसटीसी चा भाग), प्रकाश कॉटन मिल, रुबी मिल, श्रीनिवास मिल व बॉम्बे डाईंग मिल, वडाळा या गिरण्यांच्या एकूण ६३६०३.६० चौ.मी. जमिनीचा ताबा म्हाडास प्राप्त झाला आहे. या गिरण्यांच्या ६.३६ हेक्टर जागेवर गिरणी कामगारांसाठी एकूण ६७९४ सदनिकांचे बांधकाम प्रस्तावित आहे, यापैकी भारत मिल आणि सेंच्युरी मिल, ज्युबिली मिल (स्वान मिल शिवडीचा भाग) (वेस्टर्न इंडिया ते लिजहोल्ड एमएसटीसी चा भाग), प्रकाश कॉटन मिल, रुबी मिल या ठिकाणी प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात झाली आहे, तसेच श्रीनिवास मिल व बॉम्बे डाईंग मिल, वडाळा येथील योजनेचे नकाशे मंजूरीकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सादर केलेले आहेत.

---

## मुंबई व ठाणे परिसरात खाजगी वनक्षेत्रात रहाणा-या लाखो नागरीकांचे वास्तव्य असलेल्या बांधकामासंदर्भात

**(२७) ७०४९ (०७-०४-२०१५). श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व ठाणे परिसरात खाजगी वनक्षेत्रात रहाणा-या लाखो नागरीकांचे वास्तव्य असलेल्या बांधकामासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांना सुचना देण्याबाबतचे परिपत्रक निर्गमित करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी संबंधित जिल्हाधिकारी यांना कोणत्या सुचना देण्यात आलेल्या आहेत व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी सुरु असलेली कार्यवाही अद्याप पूर्ण झालेल्या नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच खाजगी वनक्षेत्रात रहाणा-या लाखो नागरीकांना दिलासा देण्यासाठी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०६-२०१५) :** (१) हे खरे आहे. मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या स्पेशल लिव्ह पिटीशन्समधील सिव्हील अपिल क्रमांक ११०२ ते ११२०/२०१४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३०.०१२०१४ रोजी दिलेल्या निर्णयानुसार शासनाच्या दिनांक

१२.१२.२०१४ पत्राच्या अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(२) उपरोक्त नमूद शासन पत्रान्वये प्रकरण निहाय आवश्यक कार्यवाही संबंधितांनी पूर्ण करावी व मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगर क्षेत्रातील मुंबईसह ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यातील वाहतुकीचा अभ्यास करून आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी एमएमआरडीएने अभ्यासासाठी निवीदा मागविण्याबाबत**

**(२८) ७०७३ (०७-०४-२०१५). श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर क्षेत्रातील मुंबईसह ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यातील वाहतुकीचा अभ्यास करून आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी एमएमआरडीएने डिसेंबर २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात अभ्यासासाठी निवीदा मागविण्यात आलेल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलीली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच एमएमआरडीए कार्यक्षेत्रातील वाहतुकीची समस्या दिवसेदिवस गंभीर होत चाललेली असल्याने यासंदर्भात आवश्यक उपाययोजना करण्यासाठी सदर प्रकरणी आतापर्यंत पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे. सदर प्रकरणी सर्वकष परिवहन अभ्यासाच्या अद्ययावती करणासाठी मागविण्यात आलेल्या निविदांचे मुल्यांकन करण्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर अंतिम टप्प्यात आहे.

---

**न्हावा -शिवा पोलिस ठाण्यांतर्गत असणा-या स्पिडी कंपनीमधून चोरीस गेलेल्या कंटेनर्सचा तपास लागला नसल्याबाबत**

**(२९) ७१५५ (०७-०४-२०१५). श्री. मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) न्हावा -शेवा पोलिस ठाण्यांतर्गत असणा-या स्पिडी कंपनीमधून माहे ऑगस्ट, २०१४ च्या सुमारास चोरीस गेलेल्या कंटेनर्सचा अद्यापही तपास लागला नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाचा तपासाची सद्यःस्थिती काय आहे,
(३) असल्यास, या प्रकरणाचा तपासास लागण-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) नाही. सदर कंटेनरचा तपास लागलेला आहे.
(२) सदर प्रकरणी न्हावाशेवा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.२४/१४, भा.दं.वि. कलम ४०७, ४२०, ४६७, ४६८, ४७१, १२० ब ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्ह्यात ११ आरोपी अटक करण्यात आले असून ४ आरोपी अद्यापही फरार आहेत. सदर प्रकरण पोलीस तपासावर प्रलंबित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केम्सपेक केमिकल कंपनी येथील (ता.पनवेल, जि.रायगड)**
**९० कंत्राटी कामगारांना कमी केल्याबाबत**

**(३०) ७१७८ (०७-०४-२०१४). श्री. मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केम्सपेक केमिकल कंपनी येथील (ता.पनवेल, जि.रायगड) ९० कंत्राटी कामगारांची नवी मुंबई जनरल कामगार संघटनेचे सभासदत्व स्वीकारल्यामुळे व्यवस्थापनाने ३२ कामगारांना कोणतीही पूर्वसूचना किंवा लेखी पत्र न देता माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या आठवडयात तडकाफडकी कामावरुन कमी केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजीपासून या कामगारांनी बेमुदत धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार या कामगारांना कामावर घेण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (११-०६-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे. व्यवस्थापनाने ३२ कंत्राटी कामगारांना कोणतीही पूर्व सूचना किंवा लेखी पत्र न देता कामावरुन कमी केले होते.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, सदर प्रकरणी चौकशी करुन संघटनेच्या तक्रारीच्या अनुषंगाने बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यानुसार झालेल्या तडजोडीनुसार ३२ कंत्राटी कामगारांना दिनांक २४.१२.२०१४ रोजी पुर्ववत कामावर घेतले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शाई व काळु या धरणांमध्ये (ता.मुरबाड, जि.ठाणे ) प्रकल्पग्रस्त झालेल्या शेतक-यांचे अद्याप पुनर्वसन न झाल्याबाबत**

**(३१) ७२६८ (०७-०४-२०१५). श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील शाई व काळु या धरणांमध्ये प्रकल्पग्रस्त झालेल्या शेतक-यांचे अद्याप पुनर्वसन न झाल्याचे व त्यांच्या जमिनीचा मोबदला न मिळाल्याचे माहे जानेवारी, २०१५ वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले व तद्नुसार प्रकल्पग्रस्त शेतक-यांचे पुनर्वसन करणे व त्यांच्या जमिनीचा मोबदला देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, दिरंगाईची कारणे कोणती ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, शासनाच्या पुनर्वसन प्राधिकरणाच्या दि. ४.५.२०११ च्या १२ व्या बैठकीत शाई व काळू नदी प्रकल्पाच्या पुनर्वसन आराखड्याला सर्वसाधारण मान्यता देण्यात आली आहे. भूसंपादन प्रक्रिये दरम्यान काळू प्रकल्पांतर्गतच्या खाजगी जमिनीची संयुक्त मोजणी पूर्ण झालेले असून, शाई प्रकल्पाच्या मोजणीस प्रकल्पग्रस्तांचा तीव्र विरोध असल्याने मोजणी होऊ शकलेली नाही. त्यामुळे या दोन्ही प्रकल्पांची भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्याने मोबदला वाटप करता आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बालचित्रवाणी व्हर्च्युअल क्लासरुम च्या रुपाने चालविण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(३२) ७३९१ (०७-०४-२०१५). श्री. अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालचित्रवाणी ही संस्था स्वायत्त असली तरीही राज्य शासनाची आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपुरा निधी अपुरे मनुष्यबळ यामुळे ही संस्था बंद पडण्याच्या मार्गावर असून केंद्र शासनाकडून निधी मिळाला नसल्याने गत नऊ महिने ४३ कर्मचारी पगारापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने बालचित्रवाणीची जबाबदारी घेतली असून व्हर्च्युअल क्लासरुम च्या रुपाने बालचित्रवाणी चालविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व याबाबत अंमलबजावणी केली आहे काय तसेच सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (०३-०६-२०१५) :** (१) होय.
(२) केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध न झाल्याने संस्थेतील ४० कर्मचाऱ्यांचे वेतन एप्रिल २०१४ पासून थकित आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील पडित मलिांना न्याय मिळवून देण्यासाठी मनोर्धर्य टिमची स्थापना करण्याबाबत**

**(३३) ७४७२ (०७-०४-२०१५). ॲड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री. शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री. योगेश सागर (चारकोप), श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने दिनांक २ ऑक्टोबर, २०१३ पासून महिला व बालविकास विभागाच्या वतीने शारीरिक अत्याचाराला बळी पडलेल्या महिला, मुली व बालकांना मदत मिळवून देण्यासाठी मनोधैर्य योजना लागू केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेनुसार पीडीत महिला व बालकांना २ ते ३ लाखांची मदत मंजूर करण्याची तरतूद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परंतु ठाणे जिल्हयातील १० टक्के प्रकरणात महिला या योजनेचा गैरवापर करत असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर योजनेचा गैरवापर करण्यात येऊ नये याबाबत शासन कोणती भूमिका घेणार आहे वा घेत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०६-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**म्हाडाच्या पुर्नविकास डी.सी.आर ३३ (५) अंतर्गत २ सी (२) चा पर्याय उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३४) ७५०१ (०७-०४-२०१५). ॲड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडाच्या पुनर्विकास डी.सी.आर ३३ (५) अंतर्गत गृहनिर्माण संस्थेला पुनर्विकास करताना गृहनिर्माण संस्थेने अधिकचे चटई क्षेत्र २सी (१) नुसार म्हाडाबरोबर विभागून द्यावे किंवा २सी (२) नुसार म्हाडाला अधिकच्या चटई क्षेत्राच्या बदल्यात अधिमुल्य द्यावे अशी तरतूद असताना दिनांक २० सप्टेंबर, २०१० ला म्हाडाने यातील २सी (२) चा पर्याय रद्द केला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अल्प उत्पनातील रहिवाशांना ३०० चौ.फु. चटई क्षेत्राची कॅप लावण्यात आली आणि चटई क्षेत्र २.५ वरुन ३ करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कॅपमुळे चटई क्षेत्र वाढवून सुध्दा रहिवाशांना ४८४ फुटावरुन ३०० चौ.फुटाचे घर मिळत असल्यामुळे रहिवाशांना अधिक क्षेत्राचे घर मिळवण्यासाठी व डी.सी.आर. ३३ (५) अंतर्गत २ सी (२) चा पर्याय उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०८-०६-२०१५) :** (१), (२), (३) व (४) हे अंशतः खरे आहे, सर्व सामान्यांसाठी अधिक घरे उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अधिमूल्य स्विकारणेऐवजी तयार घराच्या स्वरुपात मोबदला घेणे अधिक हितावह असल्याने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने ठराव क्र.६५०७ दि.२०.०९.२०१० अन्वये दि.२०.०९.२०१० नंतर प्राप्त झालेल्या पुनर्विकास प्रस्तावांबाबत पर्याय (i) नुसार बांधलेल्या सदनिका घेण्याचे धोरण स्विकारले.

तदनंतर विकास नियंत्रण नियमावली विनियम ३३ (५) मध्ये सुधारणा करण्याच्या संदर्भात शासनाने दि.०४.०५.२०१३ च्या अधिसूचनेन्वये सूचना व हरकती मागविल्या होत्या. त्यांचा अभ्यास होऊन शासनाच्या दि.०८.१०.२०१३ च्या अधिसूचनेन्वये सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंमलात आलेली आहे. सदर अधिसूचनेतील तरतूदीनुसार म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाकरीता ३ इतका वाढीव च.क्षे.नि निश्चित करण्यात येऊन त्यातून केवळ बांधकाम केलेल्या सदनिकांच्या स्वरुपात म्हाडाचा वाटा घेण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. यामुळे पुनर्विकास प्रस्तावात अधिमुल्याऐवजी फक्त हाऊसिंग स्टॉक उपलब्ध होत असल्याने अधिकाधिक परवडणा-या घरांच्या संख्येत वाढ होऊन जनतेस घरे उपलब्ध करुन देणे शक्य होईल.

शासनाच्या दि.०८.१०.२०१३ च्या अधिसूचनेन्वये अंमलात आलेल्या सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) नुसार म्हाडा वसाहतीतील सध्याच्या रहिवाशांना देखील किमान ३००.०० चौ.फुट (वापरायोग्य) पुनर्वसन क्षेत्र देय केलेले आहे. तसेच क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून म्हाडामार्फत पुनर्विकास केल्यास पुनर्वसन क्षेत्रामध्ये भरघोस वाढीची तरतूद आहे. त्यामुळे सर्वसामान्यांकरिता आवश्यक असलेल्या नविन सदनिकांऐवजी अधिमूल्य घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) मधील सुधारणानंतर म्हाडास सादर झालेल्या सुमारे ७६ प्रस्तांपैकी १८ प्रस्तावांवर देकारपत्राची कार्यवाही झाली असून एका प्रस्तावामध्ये ना हरकत प्रमाणपत्राची कार्यवाही झाली आहे. त्यामधून म्हाडास सुमारे १०८३ सदनिका उपलब्ध होणे उपेक्षित आहे. म्हाडा अभिन्यासातील इच्छुक संस्थांनी त्यांच्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी अर्ज केल्यास त्यावर म्हाडामार्फत तातडीने कार्यवाही करण्यांत येते.

---

**मालेगांव (जि. नाशिक) शहरामध्ये सट्टा, जुगार, चो-या अवैध धंदे मोठ्या प्रमाणात सुरु असल्याबाबत**

**(३५) ७५२३ (०६-०४-२०१५). श्री. आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि., नाशिक) शहरामध्ये सट्टा, जुगार, चो-या अवैध धंदे मोठ्या प्रमाणात सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालेगांव शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे हे पाहता शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

मालेगांव शहरातील सट्टा, जुगार व इतर धंदे पूर्णपणे बंद आहेत. माहे जानेवारी, २०१५ ते मार्च २०१५ दरम्यान गुप्त बातमीदारामार्फत माहिती काढून चोरुन लपून चालणाऱ्या अवैध धंद्यावर वेळोवेळी छापे टाकून मटका / जुगाराच्या एकूण २६ केसेस, दारुबंदीच्या १३ केसेस करण्यात आलेल्या असून सदर इसमांवर कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच घरफोडी सदराखाली एकूण २० गुन्हे दाखल असून त्यापैकी ८ गुन्हे उघडकीस आणले आहेत. तसेच चोऱ्यांचे एकूण ४१ गुन्हे दाखल असून ८ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. घरफोडी, चोऱ्या होवू नये या करीता मालेगांव शहरात पोलीस पेट्रोलिंग व रात्रगस्त वाढविण्यात आलेली आहे.

(२) मालेगांव शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला नाही. तसेच भविष्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये या करीता पोलीस ठाणे हद्दीतील गुप्त बातमीदारांमार्फत माहिती काढून चोरुन लपून चालणाऱ्या अवैध धंद्यावेर वेळोवेळी छापे टाकून कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे,

(३) विलंब झालेला नाही.

---

**मालेगांव ता.जि.नाशिक येथील मालेगांव शहरामध्ये पावरलुम कारखाना उद्योग मोठ्या प्रमाणात सुरु असून वारंवार वीज खंडीत होत असल्याबाबत**

**(३६) ७५२५ (०४-०४-२०१५). श्री. आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव ता.जि.नाशिक येथील मालेगांव शहरामध्ये पावरलुम कारखाना उद्योग मोठ्या प्रमाणात सुरु असून वारंवार वीज खंडीत होत असल्याने सदर उद्योजकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधित उद्योजकांनी वीज पुरवठा सुरळीत सुरु राहण्याबाबत आंदोलन व तक्रारी केल्या असल्याने यावर शासनाने आवश्यकती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे सर्वसाधरण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-०६-२०१५) :** (१) हे अशंतः खरे आहे.
(२) मालेगाव शहरात वीज पुरवठा सुधारणा करण्यासाठी पायाभूत आराखडा-१ व आर ए.पी.डी.आर.पी ह्या योजने अंतर्गत उच्चदाब वाहिनी १९.७ किमी, लघुदाब वाहिनी २१.३३ किमी, नविन वितरण रोहित्र ३३४ नग आणि वितरण रोहित्रे क्षमतावाढ १३३ नग इ. कामे कार्यान्वीत करण्यात आलेली आहेत.

तसेच केंद्र शासनाच्या प्रस्तावीत केलेल्या आय.पी.डी. ह्या योजनेमध्ये उच्चदाब वाहिनी ३५ किमी, लघुदाब वाहिनी १२९ किमी. नविन वितरण रोहित्र ४०१ नग आणि वितरण रोहित्रे क्षमतावाढ ५५९ नग इ.कामे समाविष्ट करण्यात आलेली आहेत. केंद्र शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर वरील कामांना त्वरीत सुरुवात करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) येथे अलीगड मुस्लीम विद्यापीठाची शाखा सुरु करण्याबाबत**

**(३७) ७५३६ (०८-०४-२०१५). श्री. आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) येथे अलीगड मुस्लीम विद्यापीठाची शाखा सुरु करण्याबाबत सर्व्हे करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू सर्व्हेच्या अनुषंगाने उक्त विद्यापीठाची शाखा सुरु करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-०६-२०१५) :** (१) होय.
(२) मालेगाव शहरापासून २४ कि.मी. अंतरावर चौंधी ता.मालेगाव येथील जागेची पाहणी केलेली असून सदरची जागा वनसंरक्षित क्षेत्र आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव शहरात (ता,जि. नाशिक) येथील बाल कामगांराची संख्या हजाराने असल्याबाबत**

**(३८) ७५५३ (०७-०४-२०१५). श्री. आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव शहरात (ता,जि. नाशिक) येथील बाल कामगारांची संख्या हजाराने असल्याची माहिती एका खाजगी संस्थेच्या सर्व्हेक्षणात माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, बालमजुरी कायदा अंमलात यावा त्यासाठी राज्य आणि केंद्र शासन काेटयावधी रुपये खर्च करुन योजना राबवित आहे, शाळा बाहय मुलांची संख्या कमी व्हावी याकरिता वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत असतात असे असुनही मालेगांव शहरात बाल कामगारांची संख्या हजारो आहे हे पाहता सदरहू विविध उपक्रम बाल कामगारांसाठी राबविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०५-०६-२०१५) :** (१) नाही.

(२) व (३) बालकामगार प्रथेचे निर्मूलन करण्यासाठी कृतीदलाच्या माध्यमातून वेळोवेळी धाडसत्राचे आयोजन करण्यात येते. तसेच विविध माध्यमातून शासनामार्फत जनजागृती करण्यात येते तसेच बालकामगार प्रथेतून मुक्त करण्यात आलेल्या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात समावून घेण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्यात येतो.

---

**मालेगाव शहरात (ता.जि.नाशिक) येथील भुयारी गटारे अस्तित्वात नसल्याबाबत.**

**(३९) ७५५४ (०७-०४-२०१५). श्री. आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव शहरात (ता.जि.नाशिक) येथील भुयारी गटारे अस्तित्वात नाहीत करिता केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT योजनेअंतर्गत मालेगांव शहर भुयारी गटार योजनेच्या एकूण रु. २५४.६८ कोटी किमंतीच्या अंतिम प्रस्तावास मान्यता मिळाली आहे परंत या योजनेच्या मंजूर आर्थिक आकृतीबंधामध्ये केंद्र शासनाकडील अनुज्ञेय अनुदानापोटी प्रथम हप्ता वितरीत करण्यास अवर सचिव, नगर विकास विभाग, भारत सरकार यांच्याद्वारे केंद्रीय वित्त विभागास शिफारस करण्यात आलेली आहे, परंतु सदरचे अनुदान मनपास अद्यापही प्राप्त झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेअंतर्गत मालेगाव शहरात भुयारी गटार अस्तित्वात आल्यानंतर मालेगांव मनपा कार्यक्षेत्रामध्ये निर्माण होणारे घरगुती सांडपाणी गोळा करुन त्यावर योग्य ती उपाययोजना करुन योग्य ती प्रक्रिया करुन मगच त्यांची शास्त्रोक्त विल्हेवाट लावणे इ.बाबी शक्य होणार आहे, परंतु नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हिताची असलेल्या या योजनेकरिता

आवश्यक ते अनुदान मिळत नाही हे लक्षात घेता या प्रकरणी पाठपुरावा करुन केंद्र शासनाचा आवश्यक निधी मिळण्याकरिता शासनाने कोणते प्रयत्न केले वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :** (१) केंद्र शासन पुरस्कृत जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानांच्या लहान व मध्यम शहराकरीता पायाभूत सुविधा विकास (युआयडीएसएसएमटी) या उपअभियानाअंतर्गत मालेगाव शहर भुयारी गटार योजनेच्या २५४.६८ कोटी किंमतीच्या प्रस्तावास केंद्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाने मान्यता दिलेली होती. तथापि सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या वित्त विभागाकडून प्रथम हप्त्याचा निधी वितरीत करण्यात आला नाही हे खरे आहे.
(२) व (३) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण योजनेच्या ट्रांझिशन फेज अंतर्गत केंद्र शासनाच्या शहरी विकास मंत्रालयामार्फत मान्यता देण्यात आलेल्या तथापि केंद्र शासनाकडून निधी वितरीत न करण्यात आलेल्या प्रकल्पांना निधी वितरीत करण्याबाबत राज्य शासनाकडून केंद्र शासनाशी पत्र व्यवहार करुन पाठपूरावा करण्यात आला होता. तथापि केंद्र शासनाने सदर प्रकल्प नामंजूर समजून केंद्र शासनाकडून नव्याने घोषित होणा-या योजनेमधून सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार नव्याने प्रस्ताव फेरसादर करता येऊ शकेल असे कळविण्यात आलेले आहे.

---

**सहार एलिवेटेड रोड प्रकल्पामधील बाधीतांना कायमस्वरूपी घरे मिळणेबाबत**

**(४०) ७५६३ (०६-०४-२०१५). श्री. पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सहार एलीवेटेड रोड या प्रकल्पामधील बाधीत होणाऱ्या विमानतळ प्राधिकरणाच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासियांचे स्थलांतर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर झोपडपट्टीवासियांचे दिनांक १ जानेवारी, २००० पूर्वी पासून असलेले झोपडे, परंतू दिनांक १ जानेवारी, २००० नंतर विकत घेतलेल्या 'हस्तांतरण' category मध्ये असल्याने अशा हस्तांतरीत झोपडपट्टीवासियांना शासन पुनर्वसनास पात्र करतील या सापेक्ष तात्पुरती घरे गोरेगाव येथे दिली जाणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर झोपडपट्टीवासियांना तात्पुरत्या घरामध्ये राहणाऱ्यांना किती कालावधीमध्ये उपलब्ध करुन देणार आहे,
(४) असल्यास, सदर प्रकल्प बाधितांना जुन्या घराजवळच कायमस्वरूपी घरे देण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) होय. विमानतळ प्रकल्पासाठी पात्रतेच्या निकषात बदल करणे तसेच हस्तांतरणाच्या प्रकरणात नियम शिथील करणे याबाबत शासन स्तरावर निर्णय होईल या अपेक्षेने अपात्र व अनिर्णित प्रकल्पग्रस्तांचे तात्पुरते पुनर्वसन ओशिवरा येथे करण्यात आले

आहे. तथापि १.१.२००० पूर्वी पासून अस्तित्वात असलेल्या झोपडीत सध्या वास्तव्य करणार-या झोपडीधारकास संरक्षण देण्याचे धोरण शासनाने निश्चित केले असून त्यानुसार पात्र ठरणा-यांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यात येत आहे. सदर पात्रता निश्चितीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत रहिवाश्यांना तात्पुरत्या पुनर्वसनाचा लाभ घेता येईल. सहार एलीव्हेटेड रोड प्रकल्पग्रस्तांचे कायमस्वरुपी / तात्पुरते पुनर्वसन करुन प्रकल्प पूर्ण करण्यात आला आहे. विमानतळ प्रधिकरण प्रकल्पातील बाधित प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मे.एच.डी.आय.एल. विकासकाने किरोळ रोड, कुर्ला येथील प्रिमियर कंपाऊंड येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत इमारतींचे बांधकाम केले आहे. सहा उन्नत मार्ग प्रकल्प हा विमानतळा प्राधिकरणाचा एक भाग असल्यामुळे त्याच्याकडून या प्रकल्पात बाधित होणा-या पात्र झोपडीधारकांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याकरीता कुर्ला प्रिमियर कंपाऊंड येथील इमारत क्रमांक आर-१८ व आर-१९ कडील इमारती उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

---

**राज्यातील सागरी जिल्ह्यात नाबार्डकडून मिळणा-या ग्रामीण पायाभूत विकास निधीतून जेट्टीचे बांधकाम करण्याबाबत**

**(४१) ७६२१ (०६-०४-२०१५). श्री. धैर्यशील पाटील (पेण), श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सागरी जिल्ह्यात नाबार्डकडून मिळणा-या ग्रामीण पायाभूत विकास निधीतून नऊ ठिकाणी रु.१२० कोटी खर्च करुन जेट्टीचे बांधकाम करण्यात येणार आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्या सागरी जिल्ह्यात जेट्टीचे बांधकाम करण्याचे प्रस्तावीत केले आहे,

(३) या प्रस्तावीत बांधकामांची सद्यःस्थिती काय आहे,

(४) या जेट्टीचे बांधकाम पूर्ण होऊन मच्छिमाराना याचा फायदा केव्हा पासून प्रत्यक्षात मिळणार आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०६-२०१५) :** (१) होय.

(२) (१) जि.मुंबई उपनगर - (१) खारदांडा
(२) जुहू-तारा

(२) जि. रायगड - (१) नवापाडा कोळीवाडा
(२) थेरोंडा
(३) एकदरा

(३) जि.सिंधुदूर्ग - (१) तांबळडेग
(२) केळूस

(४) जि.पालघर - (१) झाई
(२) केळवा-दादर

(३) सदर कामाच्या अंदाजपत्राकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून तांत्रिक मंजूरी देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) सदर कामे अंदाजे डिसेंबर, २०१७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

---

**रायगड जिल्ह्यातील राष्ट्रीय सहकार विकास निगम योजने अंतर्गत यांत्रिकी बोटी बांधण्याचा प्रकल्पास मान्यता व निधी देणेबाबत**

**(४२) ७७०३ (०४-०४-२०१५). श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री. धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील विविध मच्छिमार सहकारी संस्थांच्या सभासदांनी सादर केलेल्या यांत्रिकी बोटी बांधण्याच्या प्रकल्पास शासानाने मान्यता देऊनही आजतागायत त्यांना निधीचे वाटप करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंजूर यांत्रिकी बोटी बांधणेच्या प्रकल्पास शासनाने निधी उपलब्ध करणेबाबत तसेच नवीन सभासद प्रकल्प प्रस्तावास मान्यता देणेबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०६-२०१५) :** (१) नाही.
(२) व (३) सन २०१४-१५ या वर्षात विविध मच्छिमारी सहकारी संस्थांच्या ६२ गटांना निधीचे वितरण करण्यात आले आहे.

---

**उध्र्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्र.४ बाळापूर (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) चे कार्यकारी अभियंता यांनी गैरव्यवहार केल्याबाबत**

**(४३) ७७३५ (०७-०४-२०१५). श्री. अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाळापूर (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) उध्र्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्र.४ चे कार्यकारी अभियंता श्री.शेख यांनी नियमबाह्य कामे करुन कोट्यवधीचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी हिंगोली पत्रकार संघाचे अध्यक्ष नंदकुमार तोष्णीवार यांनी तत्कालीन राज्यमंत्री जलसंपदा यांच्याकडे दिनांक ३ सप्टेंबर, २०१४ रोजी प्रस्ताव सादर केला असून सदरहू प्रस्ताव मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी सचिव, जलसंपदा विभाग यांच्या कार्यालयास दिनांक ५ सप्टेंबर, २०१४ रोजी पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्नोक्त भाग १ च्या अनुषंगाने माहे फेब्रुवारी, २०१५ अखेरपर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आणि सदरची कार्यवाही अंतिमत: किती कालावधीत पूर्ण केली जाईल,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :** (१)व (२) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) या निवेदनाच्या अनुषंगाने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळामार्फत चौकशीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील वक्फ मंडळाच्या आस्थापणेवर कार्यरत असणा-या कर्मचार्यांच्या भविष्यनिर्वाह निधीचे गठन १५ टक्के मुळ पगाराबरोबर थकबाकी जमा करण्याबाबतची मागणी**

**(४४) ७७७७ (०८-०४-२०१५). श्री. अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **औकाफ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वक्फ मंडळाच्या आस्थापणेवर कार्यरत असणा-या कर्मचार्यांच्या भविष्यनिर्वाह निधीचे गठन १५ टक्के मुळ पगाराबरोबर थकबाकी जमा करण्याबाबतची मागणीच्या संदर्भात राज्य वक्फ मंडळ कर्मचारी संघटना यांच्यावतीने दिनांक १५ डिसेंबर, २०१४ वा त्या सुमारास संबंधित अल्पसंख्यांक जनप्रतिनिधी तसेच अल्पसंख्यांक विकासासंदर्भात कार्य करणा-या सेवाभावी संस्थांनी विशेषतः अल्पसंख्यांक जनप्रतिनिधी, समाजाच्या सेवाभावी संस्था यांच्यावतीने मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री अल्पसंख्यांक विकास, वित्त व नियोजन मंत्री, यांच्याकडे दिनांक २५ ऑगस्ट, २०११ आणि डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त भाग १ च्या अनुषंगाने कोणता भरीव निर्माण देण्यात आला वा येत आहे,

(३) असल्यास, निर्णयाचे स्वरुप व व्याप्ती तसेच प्रार्थीत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-०६-२०१५) :** (१) होय.

(२), (३) व (४) वक्फ मंडळाचे कर्मचारी हे शासकीय कर्मचारी नाहीत. वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ७७ (४) (C) मधील तरतूदीनुसार वक्फ मंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन व भत्त्यावरील खर्च वक्फ फंडातून केले जाणे आवश्यक आहे. तसेच कलम ७७ (३) येथील तरतूदीनुसार वक्फ फंडावर राज्य वक्फ मंडळाचे नियंत्रण असते. या दोन्ही बाबी राज्य वक्फ मंडळाकडून निर्णय होणे अपेक्षित आहे. सबब संबंधित निवेदने सुयोग्य निर्णय घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरगाबाद यांच्याकडे पाठविण्यात आलेली आहेत. सद्यःस्थितीतः वक्फ मंडळाचे सर्व उत्पन्न हे कर्मचा-यांचे वेतन व न्यायालयीन प्रकरणांवरील खर्च या दोन प्रमुख बाबीं करिताच खर्ची पडत आहे.

---

**जालना जिल्हयात राबविण्यात आलेल्या भारत निर्माण योजनेअंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या निधीचा समित्यांनी केलेला गैरव्यवहार**

**(४५) ७८५७ (०७-०४-२०१५). श्री. अर्जुन खोतकर (जालना), श्री. भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील ५८ गावातील भारत निर्माण योजनेअंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनेची कामे न करता पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या पदाधिकाऱ्यांनी कोटयवधी रुपयांच्या निधीचा गैरव्यवहार केल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात सहा गावांच्या समितीच्या पदाधिकाऱ्यांविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत **?**

**श्री. बबनराव लोणीकर (०४-०६-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) होय. सर्व पाणी पुरवठा स्वच्छता समित्यांचे बॅक स्क्रोल व उचल यामध्ये तफावत आढळून आल्यामुळे समितीला काम पूर्ण करण्यासाठी आदेशित करून कामे पूर्ण करून घेण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोलीस उपनिरीक्षक कार्यालय, बुलढाणा येथे जिवंत व्यक्तींस मृत घोषित करण्यात आल्याबाबत**

**(४६) ७८९३ (०६-०४-२०१५). डॉ. संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलीस उपनिरीक्षक कार्यालय, बुलढाणा यांनी जिवंत व्यक्तींस मृत घोषित करण्यात आल्याची घटना माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या आठवडयात घडली , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित जबाबदार अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) होय.
(२) सदर प्रकरणाची चौकशी अपर पोलीस अधिक्षक, बुलडाणा यांनी केली असून दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण तालुक्यात एकूण ६० उपकेंद्रे असून त्यातील ४७ उपकेंद्रे भाडयाच्या जागेत असल्याबाबत**

**(४७) ७९८८ (०७-०४-२०१५). श्री. वैभव नाईक (कुडाळ), श्री. भरतशेठ गोगावले (महाड), श्री. सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण तालुक्यात एकूण ६० उपकेंद्रे असून त्यातील ४७ उपकेंद्रे भाडयाच्या जागेत आहेत, हे खरे आहे काय

(२) असल्यास, १७ उपकेंद्रे बांधण्यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडे गेल्या सहा वर्षापासून प्रस्ताव प्रलंबित आहेत हेही खरे आहे काय
(३) असल्यास, ग्रामीण भागात शासकीय प्रकल्पासाठी जागा मिळत नसल्याने इमारतीसाठी निधी मंजूर होऊनही केवळ जागेच्या अभावामुळे या इमारती पूर्ण झालेल्या नाहीत हेही खरे आहे काय,
(४) उक्त उपकेंद्राना हक्काची जागा नसल्याने ग्रामीण भागातील जनतेच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(६) तदनुसार उक्त प्रलंबित प्रस्तावाना मंजूरी देण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे
(७) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

**डॉ. दीपक सावंत (१५-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही. चिपळून तालुक्यात ६० उपकेंद्रे असून त्यापैकी २७ उपकेंद्र भाड्याच्या जागेत कार्यान्वित आहेत.
(२) हे खरे नाही. जागा उपलब्ध असलेल्या १९ उपकेंद्रापैकी १५ उपकेंद्राचे बांधकाम पूर्ण झाले असून ४ उपकेंद्राच्या बांधकामाबाबत कार्यवाही सुरु आहे.
(३) हे खरे नाही. २७ उपकेंद्रासाठी मोफत बक्षिसपत्राने जागा मिळत नसल्याने निधींची मागणी करण्यात आली नाही.
(४) हे खरे नाही. जागेअभावी आरोग्य उपकेंद्राचे कामकाज भाड्याच्या व ग्राम पंचायतींच्या जागेत सुरु आहे. आरोग्य कर्मचारी यांना घरोघरी भेट देणे सक्तीचे असल्याने ग्रामीण भागातील रुग्ण आरोग्य सेवेपासून वंचित राहणार नाहीत याची दक्षता घेतली जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) आरोग्य उपकेंद्रासाठी जागा उपलब्ध नसलेल्या ठिकाणी त्याच कार्यक्षेत्रातील इतर गावात उपकेंद्र स्थलांतर करण्याबाबत संबंधित सरपंच, तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. तसेच स्थानिक वर्तमान पत्राद्वारे प्रसिध्दी देण्यात आली आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कर्जत (जि.रायगड) येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीची दुरवस्था

**(४८) ८०३४ (०७-०४-२०१५). श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि.रायगड) येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीची दुरावस्था झाल्याने तसेच डॉक्टर, परिचारिका यांची पदे रिक्त असल्याने तसेच रुग्णालयातील उपकरणे नादुरुस्त असल्याने रुग्णाना पूर्ण क्षमतेने औषधोपचार मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनामार्फत रुग्णालयाची पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार रुग्णालयाचा कारभार सुरळीत चालावा व रुग्णांना पूर्ण क्षमतेने औषधोपचार मिळावा म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे,
(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१५-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही. महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्पांतर्गत ग्रामीण रुग्णालय, कर्जतचे नुतनीकरण करुन ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यात आले असून रुग्णालयाची मुख्य इमारत सुस्थितीत आहे. रुग्णालयाच्या आकृतीबंधानुसार मंजूर ४६ पदांपैकी ४० पदे भरलेली आहेत तसेच रुग्णालयात अत्यावश्यक औषधसाठा उपलब्ध आहे.
(२) (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात ३०० हून अधिक अंगणवाड्या असून कायमस्वरूपी प्रकल्प अधिकारी नसल्याबाबत**

**(४९) ८०३५ (०७-०४-२०१५). श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात ३०० हून अधिक अंगणवाड्या असून कायमस्वरूपी प्रकल्प अधिकारी नाहीत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर एकदाही तपासणी झाली नसून अंगणवाडीतील १७ हजार बालकांचा शिक्षणाचा बोजवारा उडाला आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, (१) व (२) बाबत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार अंगणवाड्यांना प्रकल्प अधिकारी नेमणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०६-२०१५) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) होय.
(४) व (५) प्रभारी बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) कर्जत-१ व कर्जत-२ व मुख्यसेविका यांच्यामार्फत अंगणवाड्याची तपासणी करण्यात आली असून त्यामध्ये अंगणवाडी बालकांच्या शिक्षणाचे नुकसान झाल्याचे आढळून आलेले नाही. ग्राम विकास विभागाकडून बाल विकास प्रकल्प अधिका-यांची बहुसंख्य रिक्त पदे या विभागास प्राप्त झाली आहेत. सदर रिक्त पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविले असून रिक्त पदे भरण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील सिंधुदुर्ग किल्ल्याची तटबंदी दुरुस्त करण्याबाबत**

**(५०) ८०५७ (०७-०४-२०१५). श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. जयंत पाटील (इस्लामपूर), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. जयकुमार गोरे (माण), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. राहुल बोंद्रे (चिखली), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा. विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील सिंधुदुर्ग किल्ल्याची तटबंदी ढासळली असल्याचे माहे जानेवारी,२०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तटबंदीची दुरुस्ती करण्यास प्रशासन व पुरातत्व विभाग दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तटबंदीची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :** (१), (२) व (३) सिंधुदुर्ग किल्ला हा राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून तो भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ कार्यालय मुंबई यांच्या अखत्यारीत येतो. अधिक्षक पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ कार्यालय मुंबई यांनी कळविल्यानुसार प्रश्नातील नमूद बाब खरी नाही. सद्यस्थितीत तटबंदीचे व इतर किल्ल्यातील वास्तुंच्या जतन व दुरुस्तीचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.